एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-१२ राज्यसेवा (मुख्य) परिक्षा - २०२४ च्या अंतिम निकालाच्या आधारावर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून निवड झालेल्या उद्योग संचालनालयाच्या आस्थापनेवरील उद्योग उपसंचालक (तांत्रिक), गट-अ (सहायक आयुक्त, उद्योग व सेवा) संवर्गातील उमेदवारांच्या परिवीक्षाधीन प्रशिक्षण कालावधीतील अधिसंख्य पदे निर्माण करण्याबाबत व जिल्हा संलग्नतेबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग
शासन आदेश क्रमांक: नियुक्ती-२०२६/प्र.क्र.१९२/उद्योग-३
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: ०४ ऑगस्ट, २०२६.

संदर्भ: -

१. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक: टिआरएन २०१३/प्र.क्र.८४/१३/१२-अ, दि.२०.०१.२०१४.
२. वित्त विभाग, शासन निर्णय, क्रमांक: पदनि २०१६/प्र.क्र.७/१६/वित्तीय सुधारणा-१, दि.२०.०२.२०१६.
३. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक: टिआरएन-०४२४/प्र.क्र.३७/प्रशि-१, दि.०१.०८.२०२५.
४. सामान्य प्रशासन विभाग, शुध्दीपत्रक क्रमांक: टिआरएन-०४२४/प्र.क्र.३७/प्रशि-१, दि.१२.०९.२०२५.
५. सामान्य प्रशासन विभाग कार्यालयीन आदेश क्रमांक: टिआरएन-०५२६/प्र.क्र. ४३/प्रशि-३, दि. २८.०७.२०२६
६. उद्योग,ऊर्जा,कामगार व खनिकर्म विभाग, शासन निर्णय क्रमांक: इएसटी-२०२६/प्र.क्र. ६७/उद्योग-३, दि. २७.०७.२०२६
७. सामान्य प्रशासन विभाग कार्यालयीन आदेश क्रमांक: टिआरएन-०४२६/प्र.क्र. ३८/प्रशि-३, दि. ३१.०७.२०२६

<u>प्रस्तावना:-</u>

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत राज्यसेवा परिक्षेद्वारे सन २०१४ पासून प्रतिवर्षी सरळसेवेने नियुक्त होणाऱ्या गट-अ संवर्गातील पदांसाठी यशदा,पुणे या संस्थेमार्फत व गट-ब संवर्गातील पदांसाठी वनामती, नागपूर या संस्थेमार्फत दोन वर्षाच्या कालावधीसाठी एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम संदर्भाधीन क्र. १ च्या शासन निर्णयानुसार राबविण्यात येत आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून राज्यसेवा परीक्षा-२०२४ च्या अंतिम निकालाच्या आधारे संदर्भ क्र. ५ येथील नमूद कार्यालयीन आदेशाद्वारे उद्योग उपसंचालक (तांत्रिक), गट-अ (सध्याचे सहायक आयुक्त,उद्योग व

सेवा) या संवर्गामध्ये एकूण ०५ उमेदवारांची एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-१२ या तुकडी अंतर्गत दोन वर्षाच्या प्रशिक्षणासाठी परिविक्षाधीन अधिकारी म्हणून नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाकडून करण्यात आली आहे. उपरोक्त नमूद संदर्भ क्र. ६ येथील शासन निर्णयानुसार उद्योग उपसंचालक (तांत्रिक), गट-अ या पदाचे पदनाम सहायक आयुक्त (उद्योग व सेवा),गट-अ असे बदलण्यात आलेले आहे. सबब, सदर उमेदवारांसाठी एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-१२ (सीपीटीपी-१२) अंतर्गत अधिसंख्य पदे निर्माण करण्याची व त्यांच्या जिल्हा संलग्नतेबाबत आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन आदेशः-

उद्योग आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील उद्योग उपसंचालक (तांत्रिक), गट-अ (सुधारित पदनाम: सहायक आयुक्त,उद्योग व सेवा,गट-अ) संवर्गामध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून राज्यसेवा परीक्षा-२०२४ च्या अंतिम निकालाच्या आधारे सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्रमांक ५ येथील कार्यालयीन आदेशान्वये नियुक्ती देण्यात आलेल्या खालील तक्यातील स्तंभ क्रमांक २ येथील उमेदवारांकरीता वेतनस्तर एस-२० (रु.५६१००-१७७५००) मध्ये एकूण ०५ अधिसंख्य पदे त्यांच्या रुजू दिनांकापासून (दि.१०.०८.२०२६) दोन वर्षाच्या कालावधीसाठी उद्योग आयुक्तालयाच्या आस्थापनेवर निर्माण करण्याकरिता याद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

सहायक आयुक्त (उद्योग व सेवा), गट-अ

अ. क्र.	म. लो. आ. क्र.	उमेदवाराचे नाव	स्व जिल्हा व महसुली विभाग		वाटप केलेला जिल्हा (कार्यालय) व महसुली विभाग	
			स्व-महसुली विभाग	स्व-जिल्हा	महसुली विभाग	जिल्हा (जिल्हा उद्योग केंद्र)
१		२	४	५	६	७
१.	२	श्री. शिवकुमार चंद्रकांत पाटील	छ. संभाजीनगर विभाग	लातूर	पुणे विभाग	पुणे
२.	३	श्रीमती अपूर्वा संजय पाटील	पुणे विभाग	कोल्हापूर	कोकण-२ विभाग	रायगड
३.	४	श्रीमती मेघा रविंद्र सात्रस	पुणे विभाग	पुणे	नागपूर विभाग	नागपूर
४.	५	श्री. राजरत्न काशिनाथ सावणे	छ. संभाजीनगर विभाग	परभणी	नाशिक विभाग	नाशिक
५.	६	श्रीमती गीतांजली गोपाळ साठे	पुणे विभाग	कोल्हापूर	कोकण-२ विभाग	ठाणे

२. उद्योग आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील गट-अ संवर्गातील एकूण ०५ अधिसंख्य पदांच्या प्रत्यक्ष रूजू दिनांकापासून दोन वर्षाच्या कालावधीतील वेतनावर येणारा खर्च या विभागाच्या

वेतनविषयक लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो त्या त्या वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. उपरोक्त संदर्भ क्र. ५ व ७ अन्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-१२ (सीपीटीपी-१२) साठी मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या असून परिविक्षाधीन प्रशिक्षणार्थीच्या वेतनाबाबत निर्देश दिले आहेत. त्यानुसार एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-१२ (सीपीटीपी-१२) अंतर्गत प्रशिक्षण घेणा-या उद्योग आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील गट-अ संवर्गातील ०५ उमेदवारांच्या परिविक्षाधीन कालावधीतील वेतनासंदर्भात त्या त्या जिल्ह्यातील आहरण व संवितरण अधिकारी कामकाज पाहतील.

४. सीपीटीपी-१२ अंतर्गत प्रशिक्षणासाठी प्रत्यक्ष रुजू झालेल्या परिविक्षाधीन सहायक आयुक्त (उद्योग व सेवा), गट-अ यांना प्रशिक्षणाच्या पहिल्या महिन्यापासून ज्या दिनांकापासून ते रुजू झाले त्या दिनांकापासून नियमित वेतन प्रदान करण्यात यावे तसेच त्यांची सेवार्थ प्रणालीमध्ये नोंदणी करणे, एनपीएस खाते उघडणे इ. अनुषंगिक कार्यवाही त्या त्या कार्यालयाने विहित कालावधीत तातडीने पुर्ण करावी.

५. सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्र.५ च्या कार्यालयीन आदेशानुसार परिविक्षाधीन उमेदवारांच्या संदर्भातील अन्य तरतुदीनुसार कार्यवाही करण्याची जबाबदारी आयुक्त (उद्योग), उद्योग आयुक्तालय, मुंबई यांच्यावर सोपविण्यात येत आहे.

६. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या संदर्भ क्रमांक २ येथील शासन निर्णयान्वये अधिसंख्य पदे निर्माण करण्यासाठी प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन काढण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८०४१६४१२१३७५२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SHASHANK TUKARAM CHAVAN

Digitally signed by SHASHANK TUKARAM CHAVAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=IELMD, 2.5.4.20=7DD1791F8C7F2D8CBABBAE6C3C11AC3D4FE93CCAB49DAF36FF24DACD585E2276, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=A089DF063F1FFA9C6E2D052DB3C26C5B1ECE40048A4A7D39615BEE66D9E2053D, cn=SHASHANK TUKARAM CHAVAN
Date: 2026.08.04 16:42:43 +05'30'

(शशांक चव्हाण)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

आयुक्त (उद्योग), उद्योग आयुक्तालय, मुंबई

प्रत:-

१. महालेखापाल -१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई ४०० ०२०.
२. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई ४०० ०२०.
३. महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर.
४. महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर.
५. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई

६. प्रधान सचिव (उद्योग), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. संचालक, वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, वनामती, बोले पेट्रोल पंप जवळ, अमरावती रोड, धरमपेठ, नागपूर - ४४२ ४१०.
८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
९. उपसचिव (प्रशि-३), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
१०.संबंधित सर्व सह आयुक्त (उद्योग व सेवा), विभागीय कार्यालये
११.संबंधित सर्व उप आयुक्त/ सहायक आयुक्त (उद्योग व सेवा), जिल्हा उद्योग केंद्रे
१२.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१३.संबंधित सर्व जिल्हा कोषागारे अधिकारी
१४.लेखा अधिकारी, उद्योग संचालनालय, मंत्रालयासमोर, मुंबई
१५.वित्त विभाग (वित्तीय सुधारणा-१), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१६.संबंधित सर्व परिविक्षाधीन सहायक आयुक्त (उद्योग व सेवा),गट-अ
१४.निवडनस्ती.